# CCE PR


ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್, 2017

**S. S. L. C. EXAMINATION, JUNE, 2017**


ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 15. 06. 2017 ]  ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 15. 06. 2017 ]  **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A**<br>**( गद्य पद्यांशावर आधारित )** | |
| I. | एका वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 1 = 16 | |
| 1. | डोमेग्राम | 1 |
| 2. | परमेश्वर | 1 |
| 3. | पोर्तुगीजांचा ( फिरंग्याचा ) | 1 |
| 4. | 1947 | 1 |
| 5. | सातवीत ( 7 वीत ) पहिला आल्याची | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 6. | मातृमहिमा | 1 |
| 7. | अब्दुल करीम खाँ | 1 |
| 8. | शृंगेरीच्या शंकराचार्यांनी | 1 |
| 9. | मनात आणिलेल्या इच्छा पूण करतो | 1 |
| 10. | सुदेव | 1 |
| 11. | भाजी भाकरीचे | 1 |
| 12. | मुलांकरिता नाटकाचे पास आणण्याचे निमित्त करुन गेल्या | 1 |
| 13. | स्वतःच्या घरापासून | 1 |
| 14. | पंढरीचा राणा भेटीस येण्याचा | 1 |
| 15. | दवाचे थेंब | 1 |
| 16. | प्रीतिची. | 1 |
| II. | तीन-चार वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : 13 × 2 = 26 | |
| 17. | फिरंग्याची बायको पाहून श्रीमंतानी तिला साडी-चोळी नेसवून तिला नेऊन सोडण्यास सांगितले. | 2 |
| 18. | पाठाचे नाव : नोकर, छे ! मालक<br>लेखकाचे नाव : चि० वि० जोशी.<br>स्पष्टीकरण : काकूंचे एकादशी पुराण चाळ् असताना लेखकांच्या वसंता कुत्र्याने काकूंच्या बोक्यावर हला चढविला तेव्हा काकूंनी त्याची सुटका केली व बोक्याला उद्देशून वरील वाक्य म्हटले. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 19. | जपानच्या प्रगतीला दोन गोष्टी कारणीभूत :<br>i) 1819 सालीचा भूकंप<br>ii) हिरोशिमावर 1945 साली झालेला बाँब हल्ला. | 2 |
| 20. | **संत ज्ञानेश्वर :**<br>ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी ( 1275 - 1296 ), ज्ञानश्वरी, अमृतानभव, चांगदेवपासष्टी ग्रंथ<br>वयाच्या 21 व्या वर्षी संजीवन समाधी. भागवत संप्रदायाची ( वारकरी ) स्थापना, ओवीसाठी प्रसिद्धी | 2 |
| 21. | कवितेचे नाव : पाहूणे<br>कविचे नाव : केशकुमार<br>स्पष्टीकरण : फार दिवस ठाण मांडून बसलेल्या पाहुण्यांना पाहून मुलाने आईला वरील प्रश्न केला आहे. | 2 |
| 22. | स्त्रीयांच्या जीवनात सगळे ऋतू न संपणाऱ्या कष्टांची माळ घेऊन येतात. त्याच्याबरोबर कधीही न संपणारी दुःखे येतात. | 2 |
| 23. | ज्याने सोंड पाहिली तो हत्ती मुसळा सारखा म्हणाला.<br>ज्याने कान पाहिला तो हत्ती सुपासारखा म्हणाला.<br>ज्याने पाय पाहिला तो हत्ती खांबा सारखा म्हणाला.<br>ज्याने पोट पाहिले तो हत्ती कोथळ्या सारखा म्हणाला.<br>ज्याने पाठ पाहिली तो हत्ती भिंतीसारखा म्हणाला.<br>शेपूट पाहणारा हत्ती खराट्या सारखा म्हणाला.<br>(कोणत्याही 2 मुद्यांना 2 गुण द्यावेत) | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 24. | जपानी स्त्रीया ट्रॅम कंडक्टर, बस कंडक्टर, दुकानातील विक्रेत्या, हॉटेलमधील वाढपी, लिफ्टमन वगैरे. बूटपॉलिश आणि केस कापण्याच्या धंद्यात सुद्धा बऱ्याच स्त्रीया असतात. | 2 |
| 25. | लेखकांनी मनसुबा केला होता कि त्यांच्या मित्राच्या वडिलांच्या आग्रहानूसार गावी जायचे व आनंदाची बातमी घेऊन अचानक त्यांना आश्चर्याचा गोड धक्का देण्याचा मनसुबा त्यानी केला होता. | 2 |
| 26. | जेव्हा लेखक पास झाल्यानंतर दुसऱ्या गावी शिक्षणाला जायचे होते. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे जास्त खर्च शिक्षणाला लागेल या विचाराने आईचा चेहरा गंभीर झाला होता. | 2 |
| 27. | श्रीगुरुला कल्पतरुची उपमा द्यावी तर कल्पतरु हा मनात आणिलेल्या इच्छा तेवढ्याच पुरविता पण श्रीगुरुतर कल्पनेच्या ही पलिकडे असलेले असे काही प्रत्यक्ष परब्रह्म भेटवितो. | 2 |
| 28. | कवि यशवंतानी जे सैनिक स्वतःचा स्वार्थ हेतू न करता तो देशासाठी बलिदान करण्यास तत्पर असतो. तो दुसऱ्याचा विचार करतो. त्यामुळे त्याच्यात सर्व देश सामावून गेलेला असतो. | 2 |
| 29. | माहेराला 'गोकूळ' असे म्हटले आहे कारण लेकरांना खेळवण्यासाठी मामा, आजी-आजोबा, बहिणी, भाऊ वगैरे असतात. पाहूणचार चांगला होतो. खाण्यात कोणतीही कमतरता नसते. ज्याप्रमाणे गोकूळात श्रीकृष्ण गोप-गोपी, मित्र-मैत्रिणी बरोबर खात, हसत, खेळत असतो. त्यामुळे माहेराला 'गोकुळ' म्हटले आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : 10 × 3 = 30 | |
| 30. | आंबेडकर म्हणतात. "विद्येबरोबर प्रत्येकात शील पाहिजे. शिलाशिवाय विद्या फुकाची आहे. विद्येचे शस्त्र असल तरच तो शीलवान असेल. तर तो कोणाची फसवणूक करणार नाही. त्यायोगे तो एकाचे संरक्षण करील. शिक्षणापेक्षा शीलाची किंमत अधिक. | 3 |
| 31. | पावसाळ्याचा हिशेब लेखक सांगतात पावसाळा चार महिने - एकशेवीस दिवस, साठ दिवसं पाऊस-तीस दिवस रात्रीचा पाऊस - तीस दिवस सारखा पडत नाही - पंधरा दिवस थोडा झिम झिम पाऊस-कुठंतरी झाडाखाली कोपऱ्यात पाच मिनिटं थांबणे. | 3 |
| 32. | जेव्हा लेखक खुशीची वार्ता घेऊन जातात. मित्राच्या गावात व घरात अडाणी लोकांमूळे अस्पृश्यांचा, महारांचा विटाळ हे शब्द मित्राच्या तोंडातून बाहेर पडल्यामुळे लेखकाचा उत्साह कळजून गेला. | 3 |
| 33. | गावातील पंचकमिटी गणातात्यांच्या घरात घराची वाटणी करण्यासाठी आली असता, गणातात्यांनी तिसरी वाटणी करण्यास मागितली कारण त्यांचो दोन्ही मुलं दोघांना सांभाळायला तयार नसतात. | 3 |
| 34. | धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु डोक्यावर जटा धारण करुन मठामध्ये बसणे, गळयामध्ये तुळसीची माळा घालून लोकांना दंभपणा दाखविणे. स्वतःच्या भक्तिचा मोठेपणा दाखवितात. साऱ्या गप्पा मारून लोकांना भुलवितात. | 3 |
| 35. | समाजसेवक राष्ट्र व समाज यांच्यासाठी त्याग आणि बलिदान करतात. स्वार्थ-हेतू दूर ठेऊन परार्थीसाठी तत्पर असतात. सर्वच त्याचे बंधू-भगिनी आहेत याचा ते विचार करतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 36. | धुळीचेच आहे मला भूषण असे पृथ्वी म्हणते, कारण पृथ्वी सुर्याकडे प्रेमाची याचना करते व भव्य व उदात्त प्रेमाची कल्पना मांडते. सूर्याच तेज पाहून पृथ्वी म्हणते तुझ्या प्रकाशापुढे मी एक धुळीचाच कण आहे. धूळ हेच माझे भूषण आहे. | 3 |
| 37. | 'धरण' या कवितेत गरिब स्त्रीचे वर्णन केले आहे. कष्ट करून ही उपाशी राहणाऱ्या सामान्य कष्टकऱ्यांच्या भावना व्यक्त होतात. घरात दळणकांडण करुन, पहाटे उठून लवकर कामं आटोपून, तान्हया बाळाला टोपल्यात घालून, पायाला पाला बांधून ती रात्रंदिवस काम करते. | 3 |
| 38. | वयाच्या सातव्या वर्षी धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात गंगूबाईना दाखल करण्यात आले. गंगूबाईने तिथे देशप्रेमाचे धडे गिरविले. तिथे बेंद्रे मास्तर होते. ते स्वतः उत्तम कवि व संगीताचे जाणकार होते. बेंद्रे मास्तरांची प्रेमाची थाप आणि शाबासकीमुळे गंगूबाईना प्रोत्साहित झाल्यासारखे वाटले. तेथे मोठमोठे साहित्यिक व राजकरणी येत. | 3 |
| 39. | आपण श्रीकृष्णाला मनाने वरले आहे असे रूक्मिणी म्हणते कारण रूक्मिणी एक चांगल्या कुळातील कन्या होती. ती सौंदर्यशील, कुलशील आणि विद्यावान अशी होती. श्रीकृष्णाचे वर्णन तीन भुवनात सुंदर असे सद्गूण तिच्या कानावर पडले होते. जर श्रीकृष्णानी लग्न न केले तर शिशूपाळरूपी कोल्हा धाड घालील व तुझ्यासारखा सिंहाच्या मालकीच्या भागावर धाड घालून पळवून न्यावे हे कृष्णाला आवडणार नाही. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| IV. | आठ - दहा वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : 5 × 4 = 20 | |
| 40. | **पिंपळ** : हा पुरातन वृक्ष - पिंपळातले रेणू हे मानवी शरीरातील रेणूशी मिळते जुळते आहेत. पिंपळाचा औषधी उपयोग - पिंपळाला पूर्वजांनी देवाचं स्वरूप.<br>**आंबे पेरू, जांभळे** : हीसुद्धा फळे, हवा, औषधी वस्तू देतात.<br>बांबुची झाडे कडूनिंब, गुलमोहोर, अलमतांस वृक्ष हे सर्वाना प्रिय वाटतात.<br>चाफा — बडी माँ व त्याचा चमत्कार.<br>कडूनिंबही औषधी वनस्पती आहे. ( कोणत्याही चार मुद्यांना 4 गुण देणे ) | 4 |
| 41. | दत्तक मुलगा यशवंता, अग्नी कोणो द्यावा, टिटवं कुणी घ्यावं, त्यांच्या लग्नाचा विचार, त्यांचे शिकवणं, शाळा, पिण्याच्या पाण्याचा हौद, गुलामगिरी पुस्तक, शुद्राचं बोर्डिंग, बालहत्या प्रतिबंध गृह, मृत्यूपत्र, सत्यशोधक समाज असा भरपूर विचार मनात आला होता. | 4 |
| 42. | भारतात एकता, बंधुभाव, सर्वपंथीय, संप्रदाय असावे, अस्पृश्यता नष्ट व्हावी, मतभेद नसावे. गरीब - श्रीमंत एकमतांनी असावे. स्वातंत्र्य हे सर्वांच्या मनात असावे. सर्वपंथीयानी एकाच ठिकाणी बसून प्रार्थना करावी. जातीभेद विसरावा. मनात भिती नसावी. सर्वाचे घर हे स्वर्ग बनवावे. | 4 |
| 43. | या कवितेत कविने निसर्गाचे वर्णन केले आहे. पहिल्या पावसाचे स्वागत करतात. धरतीचा सुवास, धरतीतील हिरवे तृणपाते, इवल्याशा बीजापोटीचे रापटे व त्याचे सौंदर्य, मातीचे स्वरुप, पक्षी व ढगांचे वर्णन, दाही दिशांतून येणारा ध्वनी अशाप्रकारे निसर्गाचे वर्णन केले आहे. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 44. | कविता :<br>झोळी झाडाला टांगून राब राबते माऊली<br>तिथं झोळीतल्या जिवा व्हते पारखी साऊली<br>अभिषेकात घामाच्या आस देवाचं पूजन<br>पिकं हालती डोलती जनू करती भजन<br>गव्हा जोंधळ्यात तवा सोनं चांदी लकाकते<br>जशी चांदी लकाकते तशी कपाशी फुलते. | 4 |
| | **विभाग - B**<br>**( व्याकरणावर आधारित )** | |
| V. | पर्यायी उत्तरे ( बरोबर उत्तरास 1 गुण ) : 10 × 1 = 10 | |
| 45. | (ब) स्वर संधी | 1 |
| 46. | (क) स, ला, ना, ते. | 1 |
| 47. | (ब) कर्मणी प्रयोग | 1 |
| 48. | (अ) साधा वर्तमान काळ | 1 |
| 49. | (ड) जननी | 1 |
| 50. | (क) तत्पुरुषी | 1 |
| 51. | (क) ऐतखाऊ | 1 |
| 52. | (अ) क्रियाविशेषण | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| 53. | (ब) कन्नड | | 1 |
| 54. | (अ) . | | 1 |
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( बरोबर उत्तरास 1 मार्क ) : | 4 × 1 = 4 | |
| 55. | विधानार्थी वाक्य | | 1 |
| 56. | राक्षस | | 1 |
| 57. | स्त्रीलिंगी | | 1 |
| 58. | विधवा | | 1 |
| VII. | सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे ( मुद्दे ) : | 3 × 2 = 6 | |
| 59. | अलंकार - उपमा<br><br>उपमेय व उपमान यामध्ये सारखेपणा असतो. | ओळखणे - 1<br>व्याख्या - 1 | 2 |
| 60. | मेघांनी \| हे गग \| न भर \| ता गाढ \| आषाढ \| मासी<br>– – – \| – U U \| U U U \| – – U \| – – U \| – –<br>म \| भ \| न \| त \| त \| ग ग<br><br>गण – म, भ, न, त, त, ग ग<br><br>अक्षरे : 17<br><br>वृत्ताचे नाव : मंदाक्रान्ता. | वृत्ताचे नाव – 1<br>गण – 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 61. | वाक् प्रचारांचा अर्थ सांगणे $\frac{1}{2}$<br>वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$<br>i) प्रशंसा करणे, स्तुती करणे<br>ii) निश्चय करणे, योजना आखणे.<br>( वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे ). 1 | 2 |
| | **विभाग - C**<br>**( रचनेवर आधारित लेखन )** | |
| VIII. 62. | कल्पना विस्तार ( मुद्दे ) :<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |
| IX. 63. | पत्रलेखन :<br>i) प्रेषक पत्ता 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) शेवट सही $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पाठवायचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| X. 64. | निबंध : | | 5 |
| | i) आकर्षक सुरुवात | 1 | |
| | ii) विषय ज्ञान | 2 | |
| | iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) | 1 | |
| | iv) शेवट. | 1 | |